महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे | Rs.2/-

रविवार ❖ ०६ ऑक्टोबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक १०३ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 | Postal Reg. No. THC/256/2022-2024



४ थी माळ : श्री कुष्मांडा

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते
# विविध विकास कामांचे उद्घाटन




**'महाराष्ट्रातील विकासाच्या दुश्मनांना सत्तेच्या बाहेर ठेवा. अगदी शेकडो मैल दूर ठेवा'**
**- पंतप्रधान नरेंद्र मोदी**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

ठाणे : पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते ठाण्यात विविध विकास कामांचे उद्घाटन पार पडले. यावेळी बोलताना नरेंद्र मोदींनी काँग्रेससह महाविकास आघाडीवर हल्लाबोल केला.

'महाराष्ट्रात येताना एक मोठी आनंदाची बातमी घेऊन आलो आहे. केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. हा फक्त महाराष्ट्राचा आणि मराठीचा सन्मान नाही तर मराठी साहित्य कला आणि संस्कृतीचा देखील सन्मान आहे. देशातील सर्व मराठी बोलणाऱ्यांना शुभेच्छा देतो,' असं नरेंद्र मोदी म्हणाले.

एकीकडे महायुती सरकारला राज्यात विकास करायचा आहे आणि दुसरीकडे काँग्रेस आणि महाआघाडी वाले लोक त्यांना जेव्हाही संधी मिळते ते सर्व कामं ठप्प करुन टाकतात. मेट्रो ३ चं काम फडणवीस मुख्यमंत्री असताना सुरु झालं त्यावेळी ६० टक्के काम झाल होतं. पण नंतर मविआच्या काळात ही कामं थांबवण्यात आली. मविआमुळं जनतेच्या पैशांचा चुराडा झाला. मविआनं लोकांची काम रोखली होती आता तुम्हाला त्यांना रोखायचं आहे, असं नरेंद्र मोदी म्हणाले. आम्हाला विकास कारायचा आहे आणि काँग्रेसने केलेल्या खड्यांनाही भरायचं आहे. विकसित भारत हे एनडीए सरकारचं लक्ष्य आहे, असं म्हणत नरेंद्र मोदींनी काँग्रेसवर निशाणा साधला.

आधी जे लोक राष्ट्रवादावर बोलायचे ते आता लांगूलचालन करत आहेत. वक्फ बिल आणलं तर लांगूलचालन करण्याच्या राजकारणात काँग्रेसचे नवे चेले आम्हाला विरोध करत आहेत. वीर सावरकारांवर काँग्रेस टीका करते तेव्हाही काँग्रेसचे चेले त्यांच्या पाठी उभे राहत आहेत. काँग्रेस म्हणते जम्मू काश्मीरमध्ये ३७० कलम लागू करू. पण काँग्रेसच्या चेलांची बोलती बंद आहे. नवीन व्होट बँकेसाठी विचारधारेचं एवढं पतन, काँग्रेसची अशी हुजरेगिरी सुरू आहे. महाराष्ट्रात आतापासूनच काँग्रेस रंग दाखवत आहे,' अशी खोचक टीका नरेंद्र मोदींनी आपल्या भाषणादरम्यान केली.

## पेसा कायद्यातली पदे
# मानधन तत्वावर भरण्याचा निर्णय
### आदिवासी आमदारांच्या आंदोलनाची राज्य सरकार कडून दखल



मुंबई : विधानसभा निवडणुकीच्या तोडांवर राज्य सरकारकडून अनेक मोठे निर्णय घेतले जात आहेत. यातच आता राज्य सरकारने आदिवासी बांधवांसाठी महत्वाच्या निर्णयाची घोषणा केली आहे. काल राष्ट्रवादी कॉग्रेसचे नेते नरहरी झिरवाळ यांच्यासह काही आदिवासी आमदारांनी केलेल्या आंदोलनानंतर पेसा कायद्यातली पदे मानधन तत्वावर भरण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आदिवासींच्या आंदोलनानंतर राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे.

१७ संवर्गातील पदे मानधन तत्वावर भरती केली जाणार आहेत. विशेष बाब म्हणून सरकारने हा निर्णय घेतला आहे. विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांच्यासह काही आदिवासी आमदारांनी मंत्रालयाच्या तिसऱ्या मजल्यावरून सुरक्षा जाळीत उड्या घेतल्या होता. पेसा कायद्याअंतर्गत विविध जिल्ह्यातील पान ४ वर ▶▶

# राज्यातील मुलींच्या शिक्षणासाठी महत्वाचा निर्णय
### ५ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थीनींना मिळणाऱ्या शिष्यवृत्तीत तिप्पट वाढ



मुंबई : राज्य सरकारने मुलींच्या शिक्षणासाठी अगोदरच महत्वाचे निर्णय घेतले आहेत, त्यातच आता पुन्हा एकदा राज्य सरकारकडून मुलींसाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे. मुलींना मिळणाऱ्या शिष्यवृत्तीत वाढ करण्याचा मोठा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. राज्यातील इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत शिकणाऱ्या मुलींना मिळणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांच्या रक्कमेत ही वाढ करण्यात आली असल्याचे सांगण्यात येत आहे. या निर्णयानुसार राज्यातील इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थीनींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना अंतर्गत देण्यात येणाऱ्या रक्कमेत तब्बल तिप्पटीने वाढ करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीमध्ये किती पैशांची वाढ झाली? पान ४ वर ▶▶

# महाराष्ट्रातील मोठा प्रकल्प रत्नागिरीत



रत्नागिरी येथील वाटद, झाडगाव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रात २९ हजार ५५० कोटी गुंतवणुकीच्या दोन प्रकल्पांना आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली.

यामुळे ३८ हजार १२० इतकी रोजगार निर्मिती होणार आहे. उच्च तंत्रज्ञानावर आधारित या गुंतवणुक प्रकल्पांमध्ये सिलीकॉन वेफर्स, एटीएमपी, फॅब आणि अवकाश तंत्रज्ञान (एरोस्पेस) आणि संरक्षण या क्षेत्राशी संबंधित आहेत.

वेल्लोर इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी पार्क कंपनीचा उच्च तंत्रज्ञानावर आधारित सिलीकॉन वेफर्स, फॅब, एटीएमपी निर्मितीचा राज्यातील हा तिसरा अतिविशाल प्रकल्प आहे. हा प्रकल्प वाटद व झाडगाव एमआयडीसी या भागात होणार आहे. या प्रकल्पामध्ये १९ हजार ५५० कोटींची गुंतवणूक होणार आहे. त्यातून ३३ हजार प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे. दुसरा प्रकल्प रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचा असून तो एरोस्पेस आणि संरक्षण क्षेत्रातील साहित्य निर्मितीचा अतिविशाल प्रकल्प आहे. या प्रकल्पामध्ये १० हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. त्याद्वारे ४५०० रोजगार निर्मिती होणार आहे. एरोस्पेस व संरक्षण क्षेत्रातील राज्यातील हा पहिलाच अतिविशाल प्रकल्प आहे. पान ४ वर ▶▶



# सिद्धिविनायक हॉस्पिटलमध्ये लहान मुलांच्या हृदयाचे मोफत ऑपरेशन शिबीर



कल्याण : हृदयाला छिद्र असणारे चिमुकले VSD, ASD, TOF अश्या प्रकारच्या वेगवेगळ्या प्रकारच्या दुर्धर आजाराने ग्रस्त असतात. त्यांच्यावर वेळेतच उपचार होणे गरजेचे असते. परंतु घरची परिस्थिती हालकीचे असल्यामुळे इच्छा असून सुद्धा अशा मुलांची ऑपरेशन पालकांकडून केले जात नाहीत. अशा वेळी गरिब, गरजू व सर्व पालकांना दिलासा देण्यासाठी डॉक्टर अमोल गीते फाउंडेशनच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत दि.०२ ऑक्टोबर महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांचे जयंतीचे औचित्य साधून सिद्धिविनायक हॉस्पिटल, वर्तकनगर, ठाणे येथे ऑक्टोबर महिन्यामध्ये लहान मुलांच्या हृदयाचे ऑपरेशन्स पूर्णपणे मोफत करण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या महिन्यांमध्ये शंभर लहान मुलांच्या हृदयाचे ऑपरेशन पूर्णतः मोफत करण्याचा सिद्धिविनायक हॉस्पिटलने संकल्प केला आहे. दि.०२ ऑक्टोबर २०२४ पासून ही मोहीम चालू केली असून तेरा लहान मुले ॲडमिट केले आहेत. त्यापैकी सहा रुग्णांवर मोफत हृदयाचे ऑपरेशन यशस्वीपणे करण्यात आले करण्यात आले. यशस्वी ऑपरेशन झाल्यानंतर चिमुकली मुले व त्यांचे नातेवाईकांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहूण एक वेगळ्या प्रकारच्या समाधानाची अनुभूती मिळते. ही मोहीम पूर्ण महिनाभर चालू राहणार असून ठाणे आणि परिसरातील लहान मुलांसाठी सुद्धा ही मोहीम वरदान ठरणार आहे.

ज्या लहान मुलांना हृदयाचे ऑपरेशनची अवश्यकता असतील अशा मुलांच्या पालकांनी सिद्धिविनायक हॉस्पिटलमध्ये यावे. हृदयरोग तज्ञ ,हृदयाचे ऑपरेशन करणारे डॉक्टर्स, Cvts सर्जन आणि इतरही स्टाफ रुग्णांचे सेवेसाठी सज्ज असणार आहे. या ऑपरेशनसाठी एक रुपया ही खर्च न करता पूर्णपणे मोफत उपचार केले जाणार आहेत. डॉक्टर अमोल गीते फाउंडेशनचा हा सामाजिक उपक्रम असून ठाणेकरांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन सिद्धिविनायक हॉस्पिटलचे संचालक डॉक्टर अमोल गीते यांनी केले आहे.

# शहाड उड्डाणपुलाच्या विस्तारीकरणाला लवकरच सुरूवात

## खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश



कल्याण : कल्याण अहिल्यानगर या राष्ट्रीय महामार्गावर शहाड रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या रेल्वे उड्डाणपुलाचे लवकरच विस्तारीकरणाचे काम सुरू होणार आहे. त्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून निविदा जाहीर करण्यात आली आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. सध्या दोन पदरी असलेला हा उड्डाणपूल चार पदरी होणार आहे. त्यामुळे येथे होणारी वाहतूक कोंडी बंद होऊन वेगवान होण्यास मदत होईल.

कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आपल्या मतदारसंघात वेगवान रस्ते वाहतुकीसाठी आग्रही आहे. त्यामुळे हजारो कोटींचे अनेक गेमचेंजर प्रकल्प कल्याण लोकसभा मतदारसंघात सुरू आहेत. मेट्रो, रस्ते, पूल, उड्डाणपूल, रस्ते रुंदीकरण, रेल्वे मार्गांचे विस्तारीकरण अशा अनेक प्रकल्पांमधून नागरिकांची वाहतूक गतीमान झाली आहे. कल्याण - उल्हासनगरसह अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गाच्या माध्यमातून अहिल्यानगर आणि परिसराला जोडणारा शहाड रेल्वे उड्डाणपूल महत्वाचा आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या विकास आराखड्यानुसार शहाड स्टेशन येथील रेल्वेउड्डाणपुलाच्या कल्याण बाजूच्या रस्त्याची रुंदी ३० मीटर असून उल्हासनगर महानगर पालिका क्षेत्रातील ३६ मीटर आहे. या उड्डाणपुलावरची वाहतूक गेल्या काही वर्षात वाढली आहे. उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूला चार पदरी रस्ता तयार करण्यात आला आहे. मात्र उड्डाणपूल फक्त दुपदरी असल्याने अनेकदा उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूंच्या प्रवेशद्वारावर कोंडी होत असते. कधी वाहन उड्डाणपुलावर बंद पडल्यास अथवा उड्डाणपुलाची दुरुस्ती हाती घेतल्यास एकाच मार्गिकेवरून वाहतूक होते. परिणामी दोन्ही बाजूने कोंडी होत असते. त्यामुळे या उड्डाणपुलाचे विस्तारीकरण करण्याची मागणी स्थानिकांची होती. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी एमएमआरडीए प्रशासनाकडे या उड्डाणपुलाच्या विस्तारीकरणाची आग्रही मागणी केली होती. त्यासाठी निधीही मंजूर करून देण्यात आला होता. त्यासाठी आवश्यक पूर्तता झाल्यानंतर आता एमएमआरडीएने या कामासाठी निविदा जाहीर केली आहे. वाहनांची गर्दी आणि वाहतूककोंडीमुळे होणाऱ्या अपघात टाळण्यासाठी शहाड स्टेशन येथील रेल्वे उड्डाणपूल २ +२ असा चार पदरी विकसित करणे गरजेचे आहे. मुंबई महानगर विकास प्राधिकरण ग्रामीण तसेच औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी व दळणवळण व्यवस्था मजबूत करण्यासाठी विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प अंतर्गत शहाड येथील रेल्वे उड्डाणपूलाचे चौपदरीकरणाचे काम हाती घेतले आहे. या रेल्वेउड्डाण पुलाची एकूण लांबी १०९० मीटर इतकी आहे. निविदा जाहीर झाल्याने लवकरच या उड्डाण पुलाच्या कामाला सुरूवात होणार आहे. त्यामुळे शहाड पुलावरची कोंडी लवकरच फुटणार आहे. त्याबददल नागरिकांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे आभार मानले आहेत.

## गणेश विद्या मंदिर कल्याण पूर्व येथे

# भव्य आरोग्य शिबीर संपन्न



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

कल्याण : राज्यस्तरीय आरोग्य शिबिर ॲड व डॉक्टर राजू राम आणि ॲडव्होकेट शिल्पा राम या समन्वयकांमार्फत नागरिक सेवा मंडळ संचालित गणेश विद्या मंदिर कल्याण पूर्व येथे संपन्न.

उपमुख्यमंत्री, गृहमंत्री व विधी न्याय मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्यभरात गृह, विधी व न्याय मंत्रालय महाराष्ट्र शासनद्वारा तथा बेटी बचाओ बेटी पढाओ अभियान, वे टू लाईफ संस्था,सिव्हिल राईट्स ऑर्गनायझेशन संस्था, सेंचुरी रेऑन हॉस्पिटल,शहाड, आणि नागरिक सेवा मंडळ संचालित गणेश विद्यामंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि.०५/१०/२०२४ रोजी सकाळी १० ते ३ पर्यंत मोफत सामुदायिक आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते.

नागरीक सेवा मंडळाचे अध्यक्ष भगवान बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली व चिटणीस दीपक पाटील यांच्या प्रेरणेने आयोजित केलेल्या आरोग्य शिबिराचे उद्घाटन डॉक्टर राजू राम व ॲड शिल्पा राम यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका ललिता मोरे ,माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका पुष्पांजली शेणवी, आणि पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका उमा दाभोळकर,ज्येष्ठ शिक्षिका सुवर्णा भोईर तसेच इतर सर्व विभागाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उद्घाटन प्रसंगी उपस्थित होते.सेंचुरी रेयोनचे डॉक्टर हर्षल झांबरे यांनी लगेचच आरोग्य शिबिराचा ताबा घेत पालकांना तपासणी करण्यास सुरुवात केली. या शिबिरात मोफत आरोग्य तपासणी ,सर्व प्रकारचे ब्लड चेकअप, ईसीजी चेकअप, तपासणी अंती आवश्यक असल्यास ऑपरेशनसाठी रेफर शासनाच्या माध्यमातून मोफत ऑपरेशन सुविधा देण्यात येत आहे. यावेळी साधारणपणे ३५० विद्यार्थी व पालकांनी तसेच परिसरातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. शिबिरा दरम्यान नागरिक सेवा मंडळाचे उपाध्यक्ष प्रल्हाद कुरेकर, अंतर्गत हिशोब तपासणी गणेश बोरसे सदस्य मंगेश कुरेकर यांनी भेटी दिल्या .तसेच खजिनदार धनंजय पाटील शिक्षण समिती प्रमुख राजेंद्र साळुंखे यांनी शुभेच्छा दिल्या आणि गणेश बोरसे यांनी शिबिराच्या आयोजकांचे आभार व्यक्त केले.

# ४ थी माळ : श्री कुष्मांडा




***या देवी सर्वभूतेषु कुष्मांडा रूपेण संस्थिता,***
***नमःस्तस्यै नमःस्तस्यै नमःस्तस्यै नमो नमः।***

*आश्विन शुद्ध चतुर्थी म्हणजेच घटाची चौथी माळ. या दिवशी कुष्मांडा या देवी शक्तीची साधना करतात. कुष्मांड म्हणजेच कोहळा किंवा तत्सम फळ म्हणजे भोपळा. ज्यांच्यामधे निसर्गदत्त प्राणशक्ती ही सर्वात अधिक आहे. कुष्माण्डाचा आणखी एक अर्थ म्हणजे कुसुम + अण्डज म्हणजेच कुसुमासारख्या, फुलासारख्या सुंदर देवीने केलेली ब्रह्मांडाची निर्मिती. जेव्हा या चराचर विश्वाचे काहीच अस्तित्व नव्हते, तेव्हा परमेश्वरी तत्वाला इच्छा झाली, सृजनाची यएकोऽहम बहुर्यामी' ब्रह्मांड निर्माण करण्याची! तेव्हा या शक्तीची उत्पत्ती झाली व या कुष्माण्डाच्या स्मितहास्यातून विश्वाचे अस्तित्व उदयास आले, म्हणूनच ही आरंभिक अशी आदिशक्ती रूप आहे. ही देवी अष्टभूजा आहे. तिच्या हातात कमंडलू, धनुष्य बाण, कमळ, अमृतकलश, चंद्र, गदा आणि कमंडलू, माला आहे. अमृत कलश हातात आहे म्हणून हिला मोहिनी किंवा मिनाक्षीदेवी असेही म्हणतात. हिच्या हातातील जपमाला साधकाला सर्व सिद्धी व निधी देतात. हिचे वाहन सिंह आहे.*

## साई अमर मित्र मंडळाने

# देवीसाठी साकारली एलिफंटा लेण्यांची सजावट



## मंडळाच्या नवरात्रोत्सवाचे यंदाचे ३५ वे वर्ष

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

कल्याण : गणेशोत्सवा प्रमाणेच नवरात्र उत्सवात देखील देखाव्यांची स्पर्धा पाहायला मिळते. कल्याणमधील बेतूरकरपाडा येथील साई अमर शैक्षणिक व सांस्कृतिक क्रीडा मंडळाने यंदा मुंबई जवळील घारापुरी बेटावरील एलिफंटा लेण्यांचा देखावा साकारला आहे.

याठिकाणी मूर्तिकार श्याम केंबुळकर यांनी साकारलेली दुर्गादेवीची भव्य ६ फूटी मूर्ती विराजमान आहे. साई अमर शैक्षणिक व सांस्कृतिक क्रीडा मंडळाचे नवरात्रोत्सवाचे यंदाचे ३५ वे वर्ष असून दरवर्षी समाजप्रबोधनात्मक देखावे हे मंडळ साकारते. मंडळाचे अध्यक्ष राजू राणे यांच्या मार्गदर्शनाखाली नवरात्र उत्सवात नऊ दिवस पारंपारिक आगमन सोहळा, घटस्थापना, गरबा नृत्य, लहान मुलांचे, महिलांचे खेळ, महिलांचा भोंडला, म्हराळेश्वर वारकरी भजनी मंडळ, होम हवन, देवीचा भंडारा, वेशभूषा स्पर्धा, सत्यनारायण पूजा, सांस्कृतिक स्पर्धा आदी विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे तसेच लहानांपासून मोठ्यांसाठी आणि विशेषतः महिलांसाठी अनेक खेळांचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती नवरात्र उत्सव समितीचे अध्यक्ष जगदीश राणे यांनी दिली.फक्त नवरात्र उत्सव साजरा न करता वर्षभर विविध सामाजिक उपक्रम या मंडळाच्या माध्यमातून राबविले जातात. रक्तदान शिबीर, तसेच धार्मिक कार्यक्रम देखील मंडळ राबवत असून मंडळाचे पदाधिकारी, सभासद, कार्यकर्ते हा नवरात्रोत्सव पार पाडण्यासाठी मेहनत घेत आहेत.

# पोलीस पाटलाचा मित्राच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

पेण : रक्षकच भक्षक बनल्याचे संताप जनक घटना पेण तालुका घडली असून कायदा व सुव्यवस्थेची ग्रामीण भागातील जबाबदारी असणाऱ्या ६२ वर्षीय पोलीस पाटलानेच १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर वारंवार अत्याचार करून तिचे शारीरिक शोषण केल्याची घटना वडखळ विभागात घडल्याने पेण तालुक्यात संतापाची लाट उसळली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार पेण तालुक्यातील डोलवी येथील रमेश अंबाजी पाटील याने आपल्या जिवलग मित्राच्या १४ वर्षीय मुलीवर सतत २ वर्षे अत्याचार केल्याची घटना उघड झाली आहे. मित्रानेच मित्राच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याने वडखळ परिसरात खळबळ माजली आहे.

आपल्या मैत्रीचा व ओळखीचा गैरफायदा घेवून अल्पवयीन मुलीला स्पर्श करून अश्लील चाळे केले. तसेच मुलीच्या वडिलांना मारण्याची धमकी देवून २०२२ पासून ऑक्टोबर २०२४ पर्यंत तिला बोरी, कार्ला व लोणावळा या ठिकाणी नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले.

सदर प्रकरण अल्पवयीन मुलीच्या आईला समजताच तिने वडखळ पोलीस ठाण्यात जाऊन गुन्हा दाखल केला.

या गुन्हाचा अधिक तपास पोलिस निरीक्षक प्रसाद पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. फरार आरोपीचा पोलीस शोध घेत आहेत.

या संदर्भात वडखळ पोलिस ठाण्यात सी आर नं. १४९/२०२४ बी. एन. एस कलम ६४ (२) (आय) (एम), ६५ (१),७४, ।७५ (१) (१) (४), ७९, ३५१ (२) । बालकांचे लैंगिक अत्याचारापासुन संरक्षण कायदा २०१२ चे कलम ४,६,८,१२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सह्याद्री प्रतिष्ठान तर्फे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

पेण : दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान पेण शाखेने गणेशोत्सव काळात गणेश भक्तांनी बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी येताना कोणत्याही प्रकारचे हार, नारळ, पेढे, मिठाई, फळे न आणता त्याच पैशात विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल असे शालेय साहित्य आणण्याचे आवाहन केले होते. त्या आवाहनाला उत्फुर्त प्रतिसाद देत अनेक गणेशभक्तांनी वह्या, पुस्तके,खोडरबर, शॉपनर, पेन, पेन्सिल यांसारखे शालेय साहित्य आणले होते, ते साहित्य एकत्र करून आज सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानच्या मावळ्यांनी पेण तालुक्यातील तरणखोप येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील १२८ विद्यार्थ्यांना हे शालेय साहित्य वाटप केले. यावेळी सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे राज्य कार्याध्यक्ष समीर म्हात्रे, माजी तालुका अध्यक्ष रोशन टेमघरे, शाळेच्या मुख्याध्यापिका निता पाटील, शालेय शिक्षण समिति सदस्य विनोद पाटील शाळेतील यांसह शिक्षक आणि विद्यार्थी, सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे मावळे मोठ्या संख्येने उपस्थित

गणेशोत्सव काळात बाप्पाचे दर्शन घ्यायला आल्यानंतर जे पदार्थ किंवा फळे आणली जातात ते सर्वच खाल्ले जातात असे नाही किंवा खाऊन लगेच संपवले जातात,त्यापेक्षा त्याच पैशात गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल असे शालेय साहित्य आणण्याचे केले होते.त्याचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना समीर म्हात्रे यांनी आम्ही विद्यार्थ्यांना ज्या उद्देशाने हे साहित्य वाटप केले आहे तो उद्देश ते नक्की पूर्ण करतील आणि आम्ही दिलेल्या शालेय साहित्याचा पुरेपूर वापर करून चांगले शिक्षण घेऊन आपल्या शाळेचे, शिक्षकांचे आणि पाल कांचे नाव उज्वल करून भविष्यात उच्च शिक्षण घेऊन देशाचे नेतृत्व करतील अशी आशा व्यक्त केली, तर शाळेच्या मुख्याध्यापिका निता पाटील यांनी देखील नवरात्रोत्सवात सरस्वती पुजना बरोबरच शालेय साहित्य म्हणजेच सरस्वतीचे वाटप करून आमच्या विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची नवी ओढ निर्माण केली आहे आणि त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजां बाबत म्हणजेच ऐतिहासिक प्रश्नावली विचारून विद्यार्थ्यांना ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी स्फूर्ती निर्माण केली याबाबत सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे आभार मानले.

# उद्यानाच्या स्वच्छतेसाठी पुढाकार घेणाऱ्या जेष्ठ नागरिकांचा सन्मान

कल्याण : ज्येष्ठ नागरिकांच्या विरंगुळयासाठी महापालिका क्षेत्रात अनेक ठिकाणी नागरिक कट्टे व उद्याने विकसित करणार, असे प्रतिपादन महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी केले.

ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून कल्याण पश्चिमेतील प्र.के.अत्रे रंगमंदिरात ४ व ५ ऑक्टोबर रोजी कल्याण-डोंबिवली तील ज्येष्ठ नागरिकांच्या प्रतिनिधींसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या शुभारंभ समयी बोलताना महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी हे प्रतिपादन केले.

ज्येष्ठ नागरिकांसाठी नागरिक कट्यांवर मनोरंजनाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार असून, शासनाच्या वयोश्री आणि मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजनेचा लाभही ज्येष्ठ नागरिकांना घेता येऊ शकेल, त्याचप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांसाठी नविन जागा उपलब्ध करुन देण्याचा मानस आहे, असेही त्या पुढे म्हणाल्या. या कार्यक्रमात फोर्टीज हॉस्पीटल, कल्याण च्या तज्ञ डॉक्टरांमार्फत ज्येष्ठ नागरिकांना वृध्दापकाळी भेडवसाणा-या आरोग्य विषयक समस्यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये फोर्टीज हॉस्पीटल चे न्युरो सर्जन डॉ.जयेश सरधारा यांनी मेंदूच्या विकारांबाबतची माहिती, त्यावरील उपचार, आहार व व्यायाम याबाबतची माहिती दिली. तर, मायक्रोन्युरो सर्जन डॉ.ऋषभ छेडा व हृदय विकार तज्ञ डॉ.झाकीया खान यांनी हृदय विकार टाळण्यासाठी उपाय व आहार यांची माहिती दिली. त्याचप्रमाणे आर्थोपेडीक सर्जन डॉ.स्वप्निल केणी यांनी वातांचे प्रकार, त्याची कारणे, त्यावरील



उपचार व आहार याबाबतची प्रात्याक्षिकाद्वारे माहिती दिली. याचवेळी वैद्यकीय आणीबाणी उद्भवल्यास त्याचा कसा सामना करावा, कसे प्रथमोपचार करावेत याबाबत फोर्टीज हॉस्पीटलच्या परिचारीकांनी स्कीट सादर केले. यावेळी कल्याण मधील ज्येष्ठ नागरिक संघातील प्रतिनिधींचा आणि समन्वय समितीच्या पदाधिका-यांचा समाज विकास विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांचे हस्ते प्रशस्तीपत्र व स्मृतीचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक समन्वय समितीचे कल्याण मधील पदाधिकारी यशवंत कोसळुकर, आयस्कॉनचे अध्यक्ष महादेव ढोकळे, कोकण प्रादेशिक विभाग फेसकॉमचे अध्यक्ष विलास काळे, महापालिका अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, स्वच्छ भारत अभियानाचे महापालिकेचे ब्रँड अँबेसिडर डॉ प्रशांत पाटील यांची समयोचित भाषणे झाली. समाज विकास विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांनी शासनाच्या वयोश्री व मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजनेची सविस्तर माहिती आपल्या प्रास्ताविकात दिली.यावेळी निरुपणकार समिर लिमये यांनी समर्थ रामदासांच्या दासबोधाचे सोप्या सहज भाषेत निरुपण करीत ज्येष्ठ नागरिकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाची सांगता निवेदक महेश देशपांडे, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे व श्रृती कानिटकर यांनी गायलेल्या पसायदानाने झाली. ज्येष्ठ नागरिकांना डोंबिवली येथून कल्याण (प) येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात महापालिकेच्या बसद्वारे घेऊन येणे आणि जाण्याचे नेटके नियोजन डोंबिवली ज्येष्ठ नागरिक समन्वय समितीचे सुरेश पाल कर आणि डॉ. वृंदा कौजलगीकर यांनी केले.







०६ ऑक्टोबर २०२४
रविवार

**मेष**
करिअरमध्ये बदल घडवून आणण्यात यशस्वी व्हाल. कामाच्या ठिकाणीही आव्हानांचा सामना करू शकाल. तुमचे काम आणि आयुष्य यात संतुलन राखाल.

**वृषभ**
नोकरी करणाऱ्या लोकांना बदलाची संधी मिळू शकते. कुटुंबासाठी वेळ काढल्याने घरातील वातावरण प्रसन्न राहील. संध्याकाळपर्यंत कामात व्यत्यय येईल.

**मिथुन**
वैवाहिक नात्यात गोडवा राहील. जोडीदाराकडून पूर्ण सहकार्य मिळेल.मोठ्या व्यक्तीशी तुमची भेट होऊ शकते. भविष्यात ते तुमच्यासाठी खूप उपयुक्त ठरेल.

**कर्क**
नात्यात गोडवा येईल. कामाचा नव्याने विचार करू शकाल. तुमचे स्वप्न पूर्ण होणार आहे. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांमध्ये चांगले निकाल मिळतील.

**सिंह**
दिवस कुटुंबातील सदस्यांसोबत खूप आरामात जाईल.सामाजिक कार्यातही योग्य योगदान देत राहाल.तुमची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी दिवस अनुकूल आहे.

**कन्या**
व्यवसायाशी संबंधित लोकांना काही मोठे प्रकल्प मिळू शकतात.तुमच्या इच्छेनुसार परिणाम मिळतील.भागीदारीसाठी दिवस चांगला जाईल.

**तूळ**
महत्त्वाच्या कामामुळे किंवा मीटिंगमुळे तुम्हाला बाहेरगावी जावे लागेल किंवा परदेशी सहलीलाही जावे लागेल. अनुभवी व्यक्तीचा सल्ला घ्या.

**वृश्चिक**
सहलीची योजना कराल किंवा मित्रांसोबत भेट घडवाल. घरात तणाव असू शकतो. पैशाच्या बाबतीत कोणावरही विश्वास ठेवू नका आणि सर्व निर्णय स्वतः घ्या.

**धनु**
कामाची जबाबदारी तुम्ही स्वतः घेऊ शकता. आज आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा.कामाच्या ठिकाणी तुमचे निरीक्षण खूप महत्वाचे आहे.

**मकर**
कामात अधिक प्रगती होईल.जे लोक खूप दिवसांपासून नोकरीच्या शोधात आहेत, त्यांचा शोध पूर्ण होऊ शकतो. व्यावसायिक संपर्क मजबूत करा.

**कुंभ**
तुम्ही तुमच्या मुलीसाठी योग्य वर मिळवू शकता. तुम्हाला अनुभवी लोकांच्या सहवासात जाण्याची संधी मिळेल, ज्यामुळे दिवस खूप चांगला जाईल.

**मीन**
कर्मचाऱ्यांच्या कामांकडे दुर्लक्ष करू नका. अनुभवी लोकांच्या संपर्कात राहिल्याने तुमच्यासाठी फायदेशीर परिस्थिती निर्माण होईल.

# काव्य किरण मंडळाचा ‘श्राद्ध’ या विषयावर मासिक साहित्यिक मेळावा संपन्न...



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(प्रतिनिधी) -**

'काव्य किरण मंडळ, कल्याण' या मंडळाचा मासिक साहित्यिक मेळावा रविवार दिनांक २९ सप्टेंबर,२०२४ रोजी सायंकाळी ५.०० ते ८.०० या वेळेत कल्याण येथील लोक मंगलम् संस्थेच्या कार्यालयात संपन्न झाला.

पितृ पंधरवड्याचे निमित्ताने श्राद्धविधी असल्याने याला जोडून काव्य किरण मंडळाच्या दिवंगत संस्थापक सदस्यांचे काव्य वाचन व सभासदांच्या काव्य वाचनाचा कार्यक्रम तसेच मंडळाची मासिक सभा यावेळी संपन्न झाली.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे व निमंत्रित कवी म्हणून नाटककार, कवी सचिन रतन पाटील सर उपस्थित होते. मंडळाच्या अध्यक्षा कवयित्री दया घोंगे यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करण्यात आले. तर मंडळाच्या कार्याध्यक्षा कवयित्री स्वाती नातू यांनी प्रमुख पाहुणे व निमंत्रित कवी सचिन पाटील आणि विशेष उपस्थित असलेल्या कवयित्री प्रतिभा मराठे यांचे यथोचित स्वागत केले.

याप्रसंगी निमंत्रित कवी सचिन पाटील यांनी आपल्या कवितेचे सुमधुर आवाजात गायन करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

यानंतर मंडळाच्या उपस्थित पदाधिकारी व सदस्य यांनी 'श्राद्ध' या विषयावरील एकापेक्षा एक अशा सुरस व उत्तम उत्तम स्वरचित कवितांचे आणि गझल यांचे सुंदर वाचन व ताल-सुर-लय लक्षात घेऊन गायनही केले. त्यात मंडळाच्या अध्यक्षा कवयित्री दया घोंगे, मंडळाच्या कार्याध्यक्षा कवयित्री स्वाती नातू मंडळाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ कवी प्रवीण देशमुख, मंडळाचे सचिव तथा प्रसिध्द व्याख्याते व कवी शारदासुत सुनील म्हसकर, विशेष उपस्थित असलेल्या कवयित्री प्रतिभा मराठे, ज्येष्ठ सुप्रसिध्द गझलकार वा.न.सरदेसाई, कवी मनोज केळकर, कवी व गायक मनोहर मंडवाले, कवयित्री प्राजक्ता कुलकर्णी, कवयित्री संजीवनी जगताप, कवयित्री मंजिरी पैठणकर, कवयित्री आर्श्विनी म्हात्रे, लोक मंगलम् संस्थेचे संदीप कुलकर्णी यांनी वैविध्यपूर्ण रचना सादर केल्या. यावेळी काव्य किरण मंडळाच्या दिवंगत संस्थापक सदस्यांचे काव्य वाचन विद्यमान सदस्यांनी पुढील प्रमाणे केले...

१) दया घोंगे - प्रतिभा मांडे ( मदनाची मंजिरी)
२) स्वाती नातू - प्रभाकर संत (हलके ओझे)
३) सतीश केतकर - र.वी. सोमण (आसरा)
४) मनोज केळकर - किरण जोगळेकर (मी)
५) संदीप कुलकर्णी - शरूमामा बर्वे (वसंत)
६) संजीवनी जगताप - मनोहर हरकरे (आमचे हे असे)
७) मनोहर मंडवाले - विलास शिंदे (म्हातारपण), प्रभाकर नेवेवाणी (कागज की कश्ती)
८) प्राजक्ता कुलकर्णी - सुशीला जेणेकरून (कुणाच्या फंदात पडायचे नाही)
९) मंजिरी पैठणकर - प्रतिभा जोगळेकर (सदाफुलीचे आगर)
१०) सुनील म्हसकर - लालाजी मगर (आळवणी)

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती नातू यांनी सुंदर प्रकारे करून उपस्थितांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

# नवरात्रीचे नऊ रंग आणि त्यांचे महत्त्व



या वर्षी शारदीय नवरात्र, घटस्थापना ३ ऑक्टोबर पासून सुरु झाला आहे. देशभरात सर्वत्र उत्साहात व आनंदात हा उत्सव साजरा केला जातो. देवीच्या नऊ रुपांची (अवतार) पूजा केली जाते. नऊ रूपांसाठी नऊ रंग निवडले जातात. सारे वातावरण नऊ दिवस रंगीबेरंगी होऊन जाते.आपल्याला निसर्गाकडून अनेक अनमोल देणग्या मिळाल्या आहेत . त्यांपैकीच एक म्हणजे रंग. मनुष्य रंगमय विश्वात वस्ती करून राहिला आहे. मानवाला सर्वात आवडणारी गोष्ट म्हणजे ‘रंग’होय. रंग मनाला अत्यंत आल्हाद, आनंद देणारी गोष्ट आहे. मानवी मनाचा रंगांशी जवळचा संबंध आहे. भारतीय संस्कृतीत रंगांना विशेष महत्त्व आहे. त्यामुळेच हा रंगांचा उत्सव आपल्या देशात साजरा केला जातो . नवरात्रीचे नऊ रंग हे भारतीय एकात्मतेचे प्रतिक आहे. नऊ दिवस नऊ रंग परिधान केले जातात. देवीलाही नऊ दिवस नऊ रंगांची वस्त्रे नेसवली जातात.

या वर्षीचे नऊ रंग आहेत. पहिला दिवस पिवळा, दुसरा दिवस हिरवा , तिसरा दिवस करडा, चौथा दिवस भगवा, पाचवा दिवस पांढरा, सहावा दिवस लाल, सातवा दिवस निळा, आठवा दिवस गुलाबी नववा दिवस जांभळा . रंगांचा नवरात्र उत्सव अनेकांना प्रसन्न करतो . जाणून घेऊया नवरात्रीच्या नऊ रंगांविषयी आणि देवीच्या महती विषयी. ३ ऑक्टोबर गुरुवार-पिवळा रंग . या दिवशी घटस्थापना असून दुर्गा देवीच्या पहिल्या रुपाचे अर्थात शैलपुत्रीचे पूजन केले जाते . पर्वतराज हिमालयाची कन्या म्हणून तिचे नाव शैलपुत्री , पिवळा रंग हा उत्साह, चैतन्याचे प्रतीक आहे. तेज, ऐश्वर्य, संपन्नता, तेजस्वीपणा, समृद्धी इत्यादींचे प्रतीक आहे. म्हणून देवीची पूजा पिवळ्या फुलांनी आणि पिवळे वस्त्र परिधान करुन केली जाते. पिवळा रंग शांती आणि समाधान दर्शवितो.

४ ऑक्टोबर - हिरवा रंग हा निसर्गाचे प्रतिक मानला जातो . मांगल्य,पवित्र, समृध्दी, शांती शित, हिरवी धरती मातीचे सौंदर्य हे या रंगानेच आहे. हा रंग मांगल्याचे व समृद्धीचे प्रतिक आहे. नवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी देवी ब्रम्हाचारिणीची पूजा केली जाते . ब्रह्म अर्थात तपस्या आणि चारिणी याचा अर्थ आचरणात आणणारी. ५ ऑक्टोबर- राखाडी रंग हा स्थिरता, ज्ञान आणि बुद्धीचे प्रतिक मानले जाते . या दिवशी दुर्गा देवीच्या तिसऱ्या रुपाची अर्थात चंद्रघंटा देवीची पूजा केली जाते. ६ ऑक्टोबर रविवार - नारंगी (केशरी) रंग त्याग, तेजस्वीपणा, अग्नी, शांतता आणि ज्ञानाचे प्रतिक, अग्नी हा अंधाराला दूर करून प्रकाशात रुपांतर करतो. तो तेजाचे प्रतिक आहे. या दिवशी चतुर्थी असून देवी कुष्मांडाचे पूजन केले जाते. ७ ऑक्टोबर सोमवार- पांढरा रंग पवित्र, शुद्धता, स्वच्छता शांततेचा संदेश देणारा रंग शुभ्र पवित्रेचे प्रतिक मानला गेला आहे . या दिवशी महापंचमी असून स्कंदमतिचे पूजन केले जाते. ८ ऑक्टोबर, मंगळवार- लाल रंग हा प्रेमाचा, शौर्य, क्रांती, अग्नी , रागाचे आणि संघर्षाचे प्रतिक मानला जातो . या दिवशी देवी कात्यायिनीची पूजा केली जाते.९ ऑक्टोबर बुधवार - निळा रंग. विश्वास,शितलता, भव्यता, शांतता, उर्जा प्रदान करतो. या दिवशी सप्तमी असून देवी कालरात्रीची पूजा केली जाते. १० ऑक्टोबर गुरुवार गुलाबी रंग हा प्रेम, भावना, नम्रता, नम्रपणा,इ.चे प्रतिक आहे. या दिवशी महाष्टमी असते. देवी महागौरीचे पूजन करून कन्या पूजन देखील केले जाते.

११ ऑक्टोबर शुक्रवार जांभळा रंग. सत्य, छाया राजवैभव, शौर्य ध्येय आणि ऊर्जा यांचे प्रतिक मानले जाते. तेथे राजवैभव असते म्हणून याला राजश्री रंग म्हणतात. या दिवशी नवमी असून देवी सिद्धी दात्रीचे पूजन केले जाते.

१२ ऑक्टोबर शनिवार विजया दशमी या दिवशी विजया दशमी साजरी केली जाते. वाईटची चांगल्यावर मात म्हणून हा दिवस ओळखला जातो.दसरा हा सण मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो.
हिंदू देवी काली किंवा दुर्गा यांचा विजय संपूर्ण उत्सवात साजरा करतात, उपवास करतात आणि नवरात्रीचे नऊ दिवस विशेष पदार्थ तयार करतात. देवी दुर्गा सिंहावर स्वार झालेली असो किंवा देवी अंबा वाघावर स्वार होऊन असो, संदेश सुसंगत राहतोः देवीला जगाचे रक्षण आणि संरक्षण करण्यासाठी हस्तक्षेप करावा लागला, जे वाईटावर धार्मिकतेच्या विजयाचे प्रतीक आहे. लाखो लोक दहा दिवस हा सण साजरा करतात. ते नवरात्रीचे नऊ दिवस रंगांनुसार कपडे घालतात, तर मग नऊ रंगांच्या रंगसंगतीचे पोशाख आपापल्या कपाटांमधून बाहेर काढा, आणि दांडिया खेळा.
सर्वांना नवरात्रीच्या हार्दिक शुभेच्छा!

**- श्रीराम साहेबराव महाजन (कलाशिक्षक)**
**चेंबूर कर्नाटका हायस्कूल, चेंबूर. मुंबई**

# लाडकी बहीण संपर्क अभियानाला कल्याणात दणक्यात प्रारंभ

## कोट्यवधींचे घोटाळे करणाऱ्यांना दिड हजारांचे मोल कसे कळणार ? – आमदार विश्वनाथ भोईर यांचा महाविकास आघाडीवर हल्लाबोल

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(प्रतिनिधी) -**

कल्याण : मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचे पोट भरणाऱ्या राज्यातील माझ्या भगिनींसाठी दीड हजार रुपये ही खूप मोठी रक्कम आहे. कोट्यवधींचे घोटाळे करणाऱ्या लोकांना दिड हजार रुपयांचे मोल कसे कळणार? अशा शब्दांत कल्याण पश्चिमेचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला विरोध करणाऱ्या महाविकास आघाडीच्या नेत्यांवर हल्ला चढवला.
कल्याण पश्चिमेतील शिवसेनेच्या उंबर्डे - कोळीवली विभागीय शाखेतर्फे आयोजित लाडकी बहीण संपर्क अभियानाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील शेकडो लाभार्थी महिलांनी मोठी गर्दी केली होती. या लाभार्थी महिलांनी यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील गाण्यावर उपस्थित लाडक्या बहिणींनी उत्स्फूर्तपणे ठेका धरल्याचेही दिसून आले.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आल्यापासून महाविकास आघाडीतील नेत्यांनी विरोध केला आहे. काहींनी तर आमचे महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर आम्ही ही योजना बंद करू अशी जाहीर घोषणाही केली आहे. परंतु आतापर्यंत ज्या लोकांनी राज्यामध्ये कोट्यवधींचे आर्थिक




घोटाळे केले आहेत. अशा व्यक्तींना हे दिड हजार रुपये म्हणजे शुल्लक वाटत आहेत. मात्र राज्याच्या ग्रामीण भागामध्ये राहणाऱ्या माझ्या लाडक्या बहिणीसाठी या दिड हजारांचे मोल खूप जास्त असल्याचे मत आमदार विश्वनाथ भोईर यांनी यावेळी व्यक्त केले.तसेच येणाऱ्या निवडणुकीत तुम्ही एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्रीपदी विराजमान केल्यास ही योजना अव्याहतपणे सुरू राहील. इतकेच नाही तर त्यामध्ये दुप्पट वाढ करण्याचे ठोस आश्वासनही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले असल्याची आठवण आमदार भोईर यांनी यावेळी करून दिली. आणि आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून देण्याचे आवाहनही केले.या लाडकी बहीण संपर्क अभियानाला आमदार विश्वनाथ भोईर यांच्यासह शिवसेना उपनेत्या विजया पोटे, शहर प्रमुख रवी पाटील, विधानसभा संघटक छाया वाघमारे, शहर संघटक नेत्रा उगले, उपशहरप्रमूख अंकुश जोगदंड, विजय देशेकर, माजी नगरसेवक मोहन उगले, जयवंत भोईर, प्रभूनाथ भोईर, नगरसेविका वैशाली भोईर, माजी परिवहन समिती सदस्य सुनिल खारुक, विभाग प्रमुख रामदास कारभारी यांच्यासह विविध पदाधिकारी आणि महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# वीज दरवाढी विरोधात समाजवादी पार्टीचे महावितरणच्या कार्यालयावर आंदोलन

## वीज दरवाढ मागे घेऊन ३०० युनिट वीज मोफत देण्याची सपाची मागणी



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(प्रतिनिधी) -**

कल्याण : महावितरण कंपनीने वीजेची मोठी दरवाढ करुन सर्वसामान्य नागरीकांना एकप्रकारे शॉक दिला आहे. महावितरणकडुन सुरु असलेल्या वीज दरवाढीच्या निषेधार्थ समाजवादी पार्टी नवी मुंबईच्या वतीने महावितरणच्या वाशी येथील कार्यालयावर निषेध आंदोलन करण्यात आले.

यावेळी समाजवादी पार्टीच्या शिष्टमंडळाने महावितरणच्या अधिकाऱ्यांना निवेदन देऊन वाढलेल्या वीज दरात कपात करुन सर्व सामान्य नागरीकांना दिलासा देण्याची मागणी केली.

यावेळी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी देखील आंदोलनकर्त्यांना सकारात्मक प्रतिसाद देत समाजवादी पार्टीच्या मागण्यांवर योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

महावितरण कंपनीने वीजेची मोठी दरवाढ करुन सर्वसामान्य ग्राहकांना एकप्रकारे शॉक दिला आहे. प्रत्येकाला हवी असणारी वीज युनिटची किंमत आवाक्याबाहेर पोहोचली आहे. या दरवाढीमुळे ग्राहकांच्या खिशाला फटका बसत आहे. झालेली वीज दरवाढ परवडत नसल्याने सामान्य ग्राहक हतबल झाला आहे. महावितरणकडुन सुरु असलेल्या या वीज दरवाढीच्या निषेधार्थ शुक्रवारी समाजवादी पार्टीचे नवी मुंबई शहर अध्यक्ष आर.एन. यादव यांच्या नेतृत्वाखाली महावितरणच्या वाशी येथील कार्यालयावर निषेध आंदोलन करण्यात आले.

यावेळी आर.एन. यादव यांच्यासह लालचंद यादव, सर्वजीत यादव, मनोज यादव, बिंद कुमार, शिव प्रसाद, संजय यादव, सुरेश यादव, पप्पु कनौजिया, इमरान शाह, दीपक यादव, राम अवध यादव, सज्जाद खान आदींच्या शिष्टमंडळाने महावितरणच्या अधिकाऱ्यांना निवेदन देऊन वाढलेल्या वीज दरात कपात करुन सर्व सामान्य नागरीकांना दिलासा देण्याची मागणी केली.

तसेच महावितरणने जनतेला कमीत कमी ३०० युनिट वीज मोफत द्यावी, विलंब शुक्ल घेणे बंद करण्याची मागणी केली.

याबाबत महावितरण कंपनीने तातडीने कार्यवाही करण्याबाबत महावितरणच्या अधिकाऱ्यांना सुचित केले. या आंदोलनात शेकडो नागरीक सहभागी झाले होते.

# ज्येष्ठ नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी केडीएमसी क्षेत्रात नागरिक कट्टे व उद्याने विकसित करणार

## केडीएमसीच्या वतीने जेष्ठ नागरिकांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(प्रतिनिधी) -**

कल्याण : ज्येष्ठ नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी महापालिका क्षेत्रात अनेक ठिकाणी नागरिक कट्टे व उद्याने विकसित करणार, असे प्रतिपादन महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी केले. ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून कल्याण पश्चिमेतील प्र.के.अत्रे रंगमंदिरात ४ व ५ ऑक्टोबर रोजी कल्याण-डोंबिवलीतील ज्येष्ठ नागरिकांच्या प्रतिनिधींसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या शुभारंभ समयी बोलताना महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी हे प्रतिपादन केले.
ज्येष्ठ नागरिकांसाठी नागरिक कट्यांवर मनोरंजनाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार असून, शासनाच्या वयोश्री आणि मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजनेचा लाभही ज्येष्ठ नागरिकांना घेता येऊ शकेल, त्याचप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांसाठी नविन जागा उपलब्ध करुन देण्याचा मानस आहे, असेही त्या पुढे म्हणाल्या.या कार्यक्रमात फोर्टीज हॉस्पीटल, कल्याण च्या तज्ञ डॉक्टरांमार्फत ज्येष्ठ नागरिकांना वृध्दापकाळी भेडवसाणा-या आरोग्य




विषयक समस्यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये फोर्टीज हॉस्पीटलचे न्युरो सर्जन डॉ.जयेश सरधारा यांनी मेंदूच्या विकारांबाबतची माहिती, त्यावरील उपचार, आहार व व्यायाम याबाबतची माहिती दिली. तर, मायक्रोन्युरो सर्जन डॉ.ऋषभ छेडा व हृदय विकार तज्ञ डॉ.झाकीया खान यांनी हृदय विकार टाळण्यासाठी उपाय व आहार यांची माहिती दिली. त्याचप्रमाणे आर्थोपेडीक सर्जन डॉ.स्वप्निल केणी यांनी वातांचे प्रकार, त्याची कारणे, त्यावरील उपचार व आहार याबाबतची प्रात्याक्षिकाद्वारे माहिती दिली. याचवेळी वैद्यकीय आणीबाणी उद्भवल्यास त्याचा कसा सामना करावा, कसे प्रथमोपचार करावेत याबाबत फोर्टीज हॉस्पीटलच्या परिचारीकांनी स्कीट सादर केले.
यावेळी कल्याण मधील ज्येष्ठ नागरिक संघातील प्रतिनिधींचा आणि समन्वय समितीच्या पदाधिका-यांचा समाज विकास विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांचे हस्ते प्रशस्तीपत्र व स्मृतीचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक समन्वय समितीचे कल्याण मधील पदाधिकारी यशवंत कोसळुकर, आयस्कॉनचे अध्यक्ष महादेव ढोकळे, कोकण प्रादेशिक विभाग फेसकॉमचे अध्यक्ष विलास काळे, महापालिका अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, स्वच्छ भारत अभियानाचे महापालिकेचे ब्रँड अँबेसिडर डॉ प्रशांत पाटील यांची समयोचित भाषणे झाली.
समाज विकास विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांनी शासनाच्या वयोश्री व मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजनेची सविस्तर माहिती आपल्या प्रास्ताविकात दिली.
यावेळी निरुपणकार समिर लिमये यांनी समर्थ रामदासांच्या दासबोधाचे सोप्या सहज भाषेत निरुपण करीत ज्येष्ठ नागरिकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाची सांगता निवेदक महेश देशपांडे, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे व श्रुती कानिटकर यांनी गायलेल्या पसायदानाने झाली. ज्येष्ठ नागरिकांना डोंबिवली येथून कल्याण (प) येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात महापालिकेच्या बसद्वारे घेऊन येणे आणि जाण्याचे नेटके नियोजन डोंबिवली ज्येष्ठ नागरिक समन्वय समितीचे सुरेश पालकर आणि डॉ. वृंदा कौजलगीकर यांनी केले.

# सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने ‘अक्षर दिवाळी’

कल्याण : सार्वजनिक वाचनालयाने कल्याणच्या वतीने 'चला साजरी करुया अक्षर दिवाळी' या उपक्रमांतर्गत ३०० रुपयांत चार महिने दिवाळी अंक वाचण्याची संधी वाचकांना मिळणार आहे. या अंकात मराठी साहित्याचा खमंग फराळ, कथा, कविता, भविष्य, ललित लेख, प्रवास वर्णन आदींचा समावेश आहे. दिवाळी अंकाची नोंदणी कल्याण-डोंबिवली महानगरपालिके समोरील सार्वजनिक वाचनालय कल्याण येथे सुरु आहे. वाचनालयाचे सभासदत्व असणे गरजेचे नाही. अधिक माहितीसाठी संपर्क - ९८१९८६६३४७ , ९८१९९६०७५५

# मुरबाड ग्रामीण भागात घटस्थापनेला विशेष महत्त्व!



मुरबाड : मुरबाड तालुक्यातील ग्रामीण तसेच आदिवासी पट्ट्यात व मुरबाड परिसरात नवरात्रौत्सवात दुर्गा मातेची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आले आहे त्याचबरोबर ग्रामीण भागात प्रत्येक घरी असणारे कुलदैवत त्याला विशेष महत्त्व दिले जाते त्या दिवशी घटक बसविले जिथे म्हणजेच घट स्थापना बोलले जात आहे. त्या दिवशी घरातील कुलदैवतासमोर विविध प्रकारची नऊ कडधान पेरली जातात व प्रत्येक दिवशी कुल दैवत समोर तांब्याच्या कळसावर नारळ ठेवून वरती खुरक्षणाच्या पिवळ्या फुलांची माळ टांगली जाते अशा प्रकारे नऊ दिवस नऊ मला टांगल्या जातात ही परंपरा ग्रामीण भागात आजही विशेष नाही विशेष मानली जात आहे. त्याचबरोबर घंटाची विशेष घरोघरी पुजापाठ केली जात आहे.

# महाराष्ट्र राज्य शिक्षण विस्तार अधिकारी संघटना मार्फत बेमुदत उपोषण सुरू!

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(प्रतिनिधी) -**

मुरबाड : महाराष्ट्र राज्य शिक्षण विस्तार अधिकारी संघटना यांच्यामार्फत राज्यातील सर्व शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत उपोषण ५ ऑक्टोबर २०२४ पासून आझाद मैदान मुंबई येथे सुरू झाले आहे. या उपोषणात
कायम प्रवास भत्ता वेतनासोबत रु. ८०००/- मिळावा, शिक्षण सेवा गट ब प्रशासन शाखा पदोन्नतीचे प्रमाण ८० % करावे, शिक्षण सेवा गट ब ची पदोन्नती प्रक्रीया तात्काळ पूर्ण करावी. त्यासाठी सेवाजेष्ठता यादी तात्काळ प्रसिद्ध करावी, शिक्षण विस्तार अधिकारी,




संवर्ग (पद) शालेय शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करावे व या पदास सामान्य सेवा वर्ग-२ मध्ये समाविष्ठ करावे, वेतनत्रुटी दूर करुन ७ व्या वेतन आयोगात एस-१६ ची वेतनश्रेणी द्यावी, वि.अ. (शिक्षण) श्रेणी तीन वर पदोन्नती झालेल्या शिक्षण विस्तार अधिकारी यांना काही जिल्ह्यात वेतनवाढ दिली जात नाही तसेच पाच वर्षांनी श्रेणी २ वर पदोन्नती व अनुषंगिक लाभ दिले जात नाहीत याबाबत शासनाने जि. प. ना सूचना द्याव्या अशा मागण्या केल्या आहेत.वरील मागण्यासाठी मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग आणि मा. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांची संयुक्त बैठक लावून मागण्या त्वरीत मान्य कराव्यात अशी संघटनेची आग्रही मागणी आहे. सदर उपोषणात राज्यातील सर्व जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने विस्तार अधिकारी उपस्थित आहेत.
शासनाने या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद द्यावा असे आवाहन संघटनेचे राज्याध्यक्ष कैलास सांगळे, सरचिटणीस दादाराव मुसदवाले, मुरबाड शिक्षण विस्तार अधिकारी (राज्य नेते) संजय थोरात व राजेंद्र आंधळे यांनी केले आहे.

## पेसा कायद्यातली पदे...

पान १ वरून >>

रखडलेली भरती प्रक्रिया आणि नियुक्ती पत्र उमेदवारांना देण्यात यावेत यासाठी हे आदिवासी आमदार आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले होते. या आंदोलनाची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली असून मोठा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, नांदेड, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, आणि यवतमाळ या जिल्ह्यांत पेसा कायदा लागू आहे. पण सध्या सध्या पेसाभरती संबंधित प्रकरण न्यायप्रविष्ठ असून अंतिम आदेश येईपर्यंत पेसा क्षेत्रातील निवडप्रक्रियाबाबत कोणताही निर्णय न घेण्याची भूमिका सरकारने घेतली आहे. त्यामुळे या १३ जिल्ह्यांतील १७ संवर्गातील भरतीप्रक्रिया रखडली आहे. या ठिकाणी आता १७ संवर्गातील पदांवर मानधन तत्वावर भरती केली जाणार असल्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

पेसा कायदा आहे? पंचायत एकाटेंशन टू शेडबुल एरिया ॲक्ट (Panchayat Extension to Scheduled Areas Act) म्हणजेच पैसा कायदा २४ डिसेंबर १९९६ साली अस्तित्वात आला आह. या पेसाअंतर्गत येणाऱ्या भागांमध्ये आदिवासी समुदायातील १७ संवर्गातील पदानुसार जागा आरक्षित करण्यात आल्या आहेत. आदिवासी समाजाचा विकासासाठी तसेच त्यांच्या हक्काचे संरक्षणासाठी हा कायदा अस्तित्वात आणण्यात आला आहे.

## राज्यातील मुलींना...

पान १ वरून >>

सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेतून दिली जाणारी शिष्यवृत्ती ही राज्य शासनांच्या इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य विभागामार्फत देण्यात येते. इतर मागास प्रवर्गातील इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकण घेणाऱ्या फक्त मुलींना शिष्यवृत्तीच्या स्वरुपात ६० रुपये वरुन २५० प्रतिमहा अशी वाढ करण्यात आली आहे. तर विभाभज, विमान व इतर मागास प्रवर्गातील इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींना मासिक स्वरुपात दिली जाणारी १०० रुपयांची रक्कम ही ३०० रुपये प्रतिमहा अशी वाढ करण्यात आली आहे. शिष्यवृती मिळवण्यासाठी असा करा अर्ज सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्याची प्रक्रिया काय आहे? यासाठी नेमकं काय करावं? असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. तर सदर शिष्यवत्तीचा लाभ घेण्यासाठी आपल्या शाळेतील मुख्याध्यापक यांच्याशी संपर्क साधावा, किंवा आपल्या जिल्ह्याच्या संबंधित प्रादेशिक उपसंचालक इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्याशी संपर्क साधावा, या शिष्यवृत्तीमुळे शिक्षण प्रभावामध्ये मुलींचे गळतीचे प्रमाणे कमी होण्यास मदत होत आहे.

## महाराष्ट्रातील मोठा प्रकल्प...

पान १ वरून >>

या दोन्ही प्रकल्पांमुळे या भागात वाढीव रोजगार आणि व्यावसायिक उपक्रम स्थापित होऊन स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे. सदर प्रकल्पामुळे तांत्रिक नवकल्पना संशोधन आणि विकासाला चालना मिळून एक मजबूत स्थानिक पुरवठा साखळी विकसित होऊन सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योग घटकांना त्याचा मोठ्या प्रमाणात फायदा होण्यास मदत होणार आहे.

# मुरबाड विधानसभेतील सिमेंट कॉँक्रीटच्या रस्त्यांचा मॉडेल राज्यभर चालेल - आमदार किसन कथोरे






मुरबाड : मुरबाड विधानसभेतील सर्व रस्ते डांबरमुक्त होणार असून आदिवासी वाड्या पाड्यातील रस्ते सुद्धा सिमेंट कॉँक्रीटचे होणार आहेत. भविष्यात रस्त्यांसाठी निधी मागावे लागणार त्यासाठी भरीव निधीची तरतूद केली असून पावसाळा संपताच या कामांना सुरुवात होणार असल्याचे आमदार किसन कथोरे यांनी मुरबाड तालुक्यातील धसई जिल्हा परिषद गटातील सोनावळे येथे भूमिपूजना वेळी प्रतिपादन केले. यावेळी धसई गटातील कांदळी, पर्हे, खेडले -तळवलि, बांदलपाडा, पाडाळे, उमरोली, जायगाव, धसई, कळंभाड, मढ, रामपुर, सोनावळे येथिल सिमेंट कॉँक्रीटच्या रस्त्यांचे भूमिपूजन शुक्रवारी आमदार कथोरेंच्या हस्ते करण्यात आले. तसेच रामपुर येथे ग्रामपंचायतच्या वतीने नविन सुसज्ज ग्रामस्वराज भवन बांधले असून त्याचे लोकार्पण हि यावेळी आमदार कथोरेंच्या हस्ते करण्यात आले. आजही काही शहरात सुद्धा सिमेंट कॉँक्रीटचे रस्ते नाहीत ते आपण आदिवासी दुर्गम भागात मंजूर केले आहेत. एका धसई जिल्हा परिषद गटातिल रस्तांसाठि सुमारे दोनशे कोटि रूपये मंजूर केले आहेत. मुरबाड विधानसभेतील सिमेंट कॉँक्रीटच्या रस्त्यांचा मॉडेल नक्कीच महाराष्ट्र भर चालेल असा विश्वास यावेळी आमदार कथोरे यांनी व्यक्त केला.

मढ येथिल आश्रम शाळेतील विद्यार्थांनी लेझिम पथकाने आमदारांचे स्वागत केले तर लाडकी बहिण योजना तालुक्यात यशस्वीपणे राबविल्याने कळभांड येथिल महिलांनी आमदारांचे बॅनर बनवून अनोखे आभार व्यक्त केले. भूमिपूजनसाठी भाजपा सरचिटणीस नितीन मोहपे, लक्ष्मण गोल्हे, अनिल घरत, दिपक पवार, अभिजित घोलप, विठ्ठल डामसे, गणेश सुरोशे, सोमनाथ बोंबे, भूपेन्द्र मोरे, निलेश दलाल, अशोक देसले, मनोहर भोईर, अनिल वायले, गणेश कथोरे, विजय भोईर, दिलीप देशमुख, साईनाथ बोंबे उपस्थित होते.

# उद्धट डॉक्टरवर कारवाई करणार

## वैद्यकीय अधीक्षक डॉ. संग्राम डांगे यांचे आश्वासन

मुरबाड : रिपाई सेक्युलरचे युवा अध्यक्ष राजेश गायकवाड यांनी वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय मुरबाड यांच्या कडे डॉ सुहास कदम यांच्या मनमानी आणि उद्धट वर्तनाबद्दल कारवाईची मागणी केली होती आज या संदर्भात रिपाई सेक्युलर जिल्हाध्यक्ष रवींद्र चंदने यांच्यासह शिष्ट मंडळाने मुरबाड वैद्यकीय अधीक्षक यांची भेट घेत डॉ सुहास कदम यांच्यावर काय कारवाई केली याचा जाब विचारत डॉ संग्राम डांगे यांना धारेवर धरले.

यावेळी चौकशी सुरु आहे तसा पत्र व्यवहार ठाणे सिव्हिल सर्जन यांना केला असून त्याचा अहवाल आला की त्यानुसार नक्कीच कारवाई करीन असे आश्वसन दिले.

मात्र डॉ सुहास कदम यांच्यावर कारवाई केली नाही तर आपल्या हॉस्पिटल समोर आंदोलन करुन आपल्या गलथान कारभाराविरोधात आंदोलन करण्यात येईल असा इशारा रिपाई सेक्युलर जिल्हाध्यक्ष रवींद्र चंदणे यांनी दिला. याप्रसंगी अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे अण्णा साळवे, रिपाई तालूका अध्यक्ष लक्ष्मण खोलांबे, युवा अध्यक्ष राजेश गायकवाड, ॲड फ्रफुल रोकडे, सचिन धनगर, रामचंद्र टंटोळे, महेश जाधव, पत्रकार विशाल चंदने रवींद्र गायकवाड, अविनाश रातांबे इत्यादी उपस्थित होते.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मुरबाड तालुक्यातील खेवारे गावचे रहिवासी भास्कर दूंदा फाले यांची पत्नी डिलिव्हरी साठी ग्रामीण रुग्णालय मुरबाड येथे ॲडमिट केली. त्यानंतर तिच्यावर दोन दिवस उपचार केले.

मात्र डॉ सुहास कदम यांनी उलट सुलट सांगून तिला घाबरवून तिची बीपी वाढवली आणि त्या भीती पोटी तिला ताप भरला. ही बाब रिपाई सेक्युलर युवा अध्यक्ष राजेश गायकवाड यांच्या कडे लेखी निवेदन देऊन न्याय द्यावा अशी मागणी पेशंटचे पती भास्कर फाले यांनी केली. याबाबत राजेश गायकवाड यांनी वैदकीय अधीक्षक यांच्या कडे लेखी तक्रार करुन डॉक्टर सुहास कदम याच्यावर कारवाईची मागणी केली. सदर महिला हिच्यावर दोन दिवस उपचार केले. तिची प्रकृती बिघडली त्यानंतर तिला रेफर करणे चुकीचं आहे. असं सांगून देखील तिला सेंट्रल हॉस्पिटल ला न्या नाहीतर प्रॉब्लेम होईल अशी भीती त्यांच्या मनात भरली. डॉ कदम यांनी त्यांना आधार देण्याऐवजी घाबरवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर भास्कर फाले यांनी विनंती केली असता त्यासाठी खर्च करावा लागेल असे डॉ कदम यांनी सांगून पाच हजार रुपयाची मागणी केली. पेशंटच्या नातेवाईक यांनी पैसे देण्यास नकार दिला. त्यानंतर डॉ कदम यांनी काहीएक ऐकून न घेता, पेशंट आरती भास्कर फाले यांना सेंट्रल रुग्णालय उल्हासनगर येथे नेण्यासाठी रेफर केली.

या बोगस कारभाराला आला बसावा यासाठी भास्कर फाले यांनी राजेश गायकवाड यांच्याकडे पत्र व्यवहार करुन न्यायची मागणी केली. यावेळी रिपाई सेक्युलर युवा अध्यक्ष यांनी पत्र देऊन, वैद्यकीय अधीक्षक मुरबाड यांच्याकडे. डॉ सुहास कदम यांच्या मनमानी कारभाराविरोधात कारवाई करावे अशी मागणी केली होती. कारवाई किंवा लेखी असं उत्तर न मिळाल्याने आज जिल्हाध्यक्ष रवींद्र चंदने यांनी डॉ डांगे यांची भेट घेऊन कारवाईची मागणी केली. येत्या आठ दिवसात डॉ कदम वर कारवाई केली नाही तर कारभाराविरोधात लोकशाहीच्या मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा दिला.

# अपहरण झालेला दर्शन पाटील सापडला



झिडके-अंबाडी : भिवंडी तालुक्यातील मौजे-' झिडके' गावचा कायम रहिवासी असणारा मुलगा ' दर्शन ' संतोष पाटील हा नेहमी प्रमाणेच सकाळी- ७.०० वाजता वसई येथे कॉलेजसाठी मौजे- झिडके येथून जात असे, व संध्याकाळी- ५.३० वा.वसई येथून घरी येत असे. परंतु दिनांक-०१/१०/२०२४ रोजी वसई येथे कॉलेजमध्ये गेलेला 'दर्शन' हा घरी न आल्यामुळे त्याच्या पालकांची चिंता वाढली, त्यामुळे पालकांनी आपल्या नातेवाईक यांच्याकडे शोध घेतला असता, त्याचा तपास काही लागेना. शेवटी आपला मुल गा अपहरित झाला आहे अशी खात्री पालकांची झाल्यानंतर पालक संतोष श्रीरंग पाटील यांनी दिनांक-०१/१०/२०२४ रोजी रात्री ११.०० वा.गणेशपुरी पोलीस स्टेशन येथे आपल्या अपहरित मुलाबद्दल गुन्हा नोंदविण्यात आला.

त्यानंतर गणेशपुरी पोलीस यांच्याकडून अपहरित गुन्ह्याचे तपासकार्य सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीपान सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखालीच पोलीस उपनिरीक्षक प्रदीप नाईक, पो.हवालदार गांगडे यांनी तपासकार्य सुरू केले.याकरिता सी.सी.कॅमेरे फुटेज, वर्तमानपत्र व टी.व्ही.चॅनल यांचा वापर केला. अशा प्रकारे सदर मुलगा ज्या-ज्या ठिकाणी गेला होता, त्या-त्या ठिकाणचे फुटेज पुरावे गोळा करीत असताना, मुंबई सी.एस्.टी.रेल्वे स्टेशन येथे आरक्षण तिकिटांच्या तपासकार्यअंती'

दर्शन ' हा गोवा-पणजी येथे जाणाऱ्या मेलमधून पणजी येथे गेल्याचे निष्पन्न झाले.व दिनांक-०४/१०/२०२४ रोजी पोलीस यंत्रणा कार्यामुळे गोवा-पणजी येथे असल्याचा मेसेज एका हॉटेल मालकांकडून गणेशपुरी पोलिसांना मिळताच, त्यांनी सदर अपहरित मुलाच्या पालकांना कळविले, व अज्ञात ठिकाणी जाण्यास सांगितले. सद्दस्थितीत अपहरित मुलगा दर्शन हा पालक संतोष पाटील यांच्यासोबत असल्याचे पोलीस सूत्रांकडून सांगण्यात आले.अशा प्रकारे अगदी अल्पावधीतच एक अपहरित मुलाचा शोध गणेशपुरी पोलीसांकडून लावल्यामुळे नागरिकांकडून पोलिसांच्या कर्तव्यदक्ष कामगिरीचे कौतुक तसेच अभिनंदनही केले जात आहे.

# 'नवरात्र उत्सव स्वच्छतेचा'

## उपक्रमात स्वच्छता देवीचा सत्कार

ठाणे : प्रतिवर्षी स्वच्छता मोहीम 'स्वच्छता पंधरवडा' १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत हिंदुस्थानात सर्वत्र साजरा झाला, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या स्वच्छता मोहीम संकल्पनेला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात स्वच्छता पंधरवडा साजरा केला गेला.

या निमित्ताने खासदार नरेश म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली वॉर्ड क्र.१४ स्वातंत्र्यवीर सावरकर नगरामध्ये ठाणे महानगर पालिका अंतर्गत स्वभाव स्वच्छता व संस्कार स्वच्छता ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. 'ठाणे बदलतंय' ही संकल्पना घेऊन 'उत्सव स्वच्छतेचा' हा उपक्रम वॉर्ड क्र.१४ मध्ये दिलीप बारटक्के मा. नगरसेवक मा. गटनेते यांचा मार्गदर्शनाखाली नवरात्री मध्ये रविवार ६ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६ वा 'नवरात्र उत्सव स्वच्छतेचा' या उपक्रमात स्वातंत्र्यवीर सावरकर नगरातील सार्वजनिक उत्सव मंडळा तर्फे सफाई महिला कर्मचारी म्हणजेच 'स्वच्छता देवीचा' सत्कार करण्यात येणार आहे.या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रम मराठी-लोकगीते महाराष्ट्र गीते, नवरात्री देवीची गाणी आणि कोळी गीतांचा सुरेल नजराणा हर्षल कराओके म्युझिकल ग्रुप तर्फे गायक यशवंत कालेकर, गायक उमेश गायकवाड, गायिका अंजली बोरोले आपल्या गोड आवजात सादर करणार आहेत. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल कौतुक सोहळा, भगवा रंग दिवस, महाराष्ट्र डे, पथनाट्य, दांडिया दिमाखात साजरा होणार आहे. नवरात्र उत्सव स्वच्छतेचा 'स्वच्छता देवीचा' सत्कार या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन सार्वजनिक उत्सव मंडळाच्या वतीने संजय चिचकर अध्यक्ष, दीपक निकम सचिव, वैभव चव्हाण कार्याध्यक्ष. सखाराम अहिरे खजिनदार, व दिलीप चंद्रकांत बारटक्के मा नगरसेवक, मा गटनेता यांनी केले आहे.

# महावितरण कंपनीच्या २१ लाखांच्या विद्युत खांबांचा अपहार

## आरोपीच्या मुसक्या आवळल्या



पारनेर : सौ . दिपक भिका वरखडे पाटील यांजकडून .- वीज महावितरण कंपनीने कान्हुर पठार येथील सुधारित वीज वितरण क्षेत्र योजनेच्या प्रकल्पाचे विदयुत खांब उभे करण्याचे दिलेले काम पुर्ण न करता महावितरण कंपनीचे २१ लाख रुपये किंमतीचे वीज खांब परस्पर गायब करून अपहार केल्याप्रकरणी सोलापूर जिल्ह्यातील ठेकेदार हर्षवर्धन महावीर यादव वय २९ वर्षे याला मुद्देमाला सह ताब्यात घेण्यात आले.

वीज महावितरण कंपनीने कान्हुर पठार येथे सुधारित वीज वितरण क्षेत्र योजनेच्या प्रकल्पाचे लोखंडी विद्युत खांब बसविण्याचे काम सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील बेंबळे येथील हर्षवर्धन महावीर यादव वय २९ वर्षे याला देण्यात आले , परंतू त्याने महावितरण चे काम न करता त्याने महावितरण कंपनीने दिलेले ९ मीटर चे १४९ व ११ मीटर चे १० असे २१ लाख रुपयांचा मुद्देमाला चा अपहार केल्याचा गुन्हा रजिस्टर नं . ६१६ / २०२४ भारतीय दंड विधान कलम ४०६ नुसार पारनेर पोलीस स्थानकात दाखल करण्यात आला . जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला , अप्पर पोलीस अधिक्षक खैरे , उपविभागीय पोलिस अधिकारी भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक खंडागळे , पोलीस हेड कॉन्स्टेबल गुजर , डमाळे , वाघ , बुधवंत , डोंगरे , दळवी या पोलीस पथकाने गुप्त खबरींच्या माहितीनुसार आरोपी ठेकेदार हर्षवर्धन महावीर यादव याला अपहार केलेला महावितरणचे १७ लाख ५० हजार रुपयांचे १३१ लोखंडी खांब मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे . पुढील तपास वरीष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल श्यामसुंदर गुजर हे तपास करीत आहे .

**पारनेर तालुक्यातील अलीकडच्या काळातील ही सर्वांत मोठी अपहारा ची मोठी घटना असून पारनेर पोलीसांनी त्वरीत कारवाई करून आरोपी ला मुद्देमालासह ताब्यात घेतल्याने पारनेर तालुक्यात खळबळ उडाली आहे , तर पारनेर पोलीसांच्या कारवाईचे स्वागत होत आहे . .**

# महात्मा फुले पोलीस ठाणेचे हद्दितुन मुलांचे अपहरण करणारे आरोपी जेरबंद



पालघर : ०३ तारखे पासून सर्वत्र नवरात्रौत्सव हा अतिशय उत्साहात साजरा केला जात आहे. नवरात्रौत्सव सणादरम्यान विविध नवरात्रौत्सव मंडळे, हाउसिंग सोसायट्यांमध्ये आणि गावागावांमध्ये गरब्याचे आयोजन केले जाते.

गरब्यादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरीता बाळासाहेव पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आपआपले हद्दित प्रभावी गस्त करणेबाबत सुचना दिलेल्या होत्या. त्याअनुषंगाने दिनांक ०४/१०/२०२४ रोजी २१:०० वा. कासा पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी अविनाश मांदळे, मनोहर जाधव, चालक जगदिश जाधव, ईस्वाईल चाँद सय्यद असे पोलीस ठाण्यातील डायल ११२ वाहनामधुन पोलीस ठाणे हद्दित नवरात्र / गरबा बंदोबस्ताचे अनुषंगाने रात्रौगस्त करत असतांना चारोटी ब्रिजच्या खाली काही इसम व महिला आपसामध्ये वादविवाद करुन एकमेकांना मारहाण करत असल्याचे दिसले

म्हणून सदरचे पथक वाहण थांबवून भांडण सोडविण्यासाठी गेले. सदर भांडण करणाऱ्या महिला व पुरुषांजवळ दोन लहान मुल बसल्याचे दिसल्याने प्रथम भांडण सोडवून

मुलांना विश्वासात घेऊन विचारपुस केली असता त्यांनी भांडण करणारे महिला व पुरुषांनी त्यांना कल्याण येथून पळवून आणल्याचे सांगितले. मुलांच्या देहबोलीवरुन ते खरे बोलत असल्याची खात्री झाल्याने त्वरीत सदर इसमांना ताब्यात घेऊन त्यांना त्यांचे नांव पत्ता विचारता त्यांनी १) विनोद रामबापू गोसावी, वय २९ वर्ष, २) आकाश विजेश गोसावी, वय २८ वर्ष, ३) अंजली विजेश गोसावी, यय २८ वर्ष, ४) चंदा विजेश गोसावी, वय ५५ वर्ष, ५) जयश्री अशोक गोसावी वय २५ वर्ष, ६) राहुल रामअप्पा गोसावी, वय २७ वर्ष, सर्व रा. मेशाळ विजयनगर ता. मिरज जि. सांगली असल्याचे सांगितले. तसेच लहान मुलांना ताब्यात घेऊन त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारता त्यांनी १) वय ८ वर्ष, २) वय ५ वर्ष, असे सांगितले. मुलांकडे केलेले चौकशीतून त्यांना कल्याण येथुन नमुद ताब्यात घेतलेले इसमांनी पळवुन आणले बाबत पुष्टी मिळत असल्याने त्वरीत कल्याण महात्मा फुले पोलीस ठाणे जि. ठाणे येथे संपर्क केला असता तेथे गुन्हा रजि. नं. १०११/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७(२) प्रमाणे वर नमूद मुलांचे अपहरण झालेधाबत गुन्हा नोंद असल्याची खात्री इसली.

सदर महात्मा फुले पोलीस ठाणे जि. ठाणे यांना संपर्क साधुन आरोपीत व अपहरीत मुले यांची माहिती देवून आरोपीत व अपहरीत मुले यांना त्यांचे ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कामगिरी बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक पालघर, गणपत पिंगळे, उप विभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अविनाश मांदळे, प्रभारी अधिकारी, कासा पोलीस ठाणे, पोहवा / १२५ मनोहर शंकर जाधव, चालक पोहवा /९५ जगदिश श्रीधर जाधव, पोशि/११५२ ईवाईल चाँद सय्यद सर्व नेमणूक कासा पोलीस ठाणे यांनी उत्कृष्टरित्या केली आहे.

# दिव्यात आर पी एल शाळेत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेचं आयोजन

दिवा : दिव्यातील RLP हायस्कूल च्या सर्व विद्यार्थ्यांसा आहे फिजिक्स वाला इन्स्टिट्यूट यांनी शाळेच्या समन्वयाने विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन केले त्यांच्या परीक्षांचा उद्देश हुशार विद्यार्थ्यांना ओळखणे आणि शिक्षणतज्ज्ञांना प्रोत्साहन देणे हा आहे. या परीक्षेत गणित, विज्ञान आणि मानसिक क्षमता या प्रमुख विषयांचा समावेश होता. ही परीक्षा शनिवार, ५ ऑक्टोबर रोजी सकाळी ९:०० ते १०:०० या वेळेत घेण्यात आली. प्रतिभा दाखवण्याची ही सुवर्णसंधी होती. सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेला बसणे बंधनकारक होते. या संस्थेतर्फे पहिल्या तीन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाईल तसेच परीक्षेसाठी शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका उपस्थित होत्या प्रसंगी संस्थेचे मुख्य विश्वस्त श्री राजेश पांडे, व इतर विश्वस्त मनोज पांडे, संतोष पांडे, प्रमोद पांडे उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका पुष्पकला जैस्वार व शाळेतील इतर सर्व शिक्षिका व इतर शिक्षकेतर कर्मचारी यांच्या निगराणीत ही परीक्षा पार पडली. या परीक्षेमध्ये मुलांच्या बुद्धिमत्तेचा विकास होण्यास मदत होईल व विद्यार्थ्यांना अभ्यासाची सवड मिळेल असे यावेळी शाळेच्या संचालकांनी बोलताना स्पष्ट केले







नियमित वाचा
दै. ठाणे
जीवनदीप वार्ता

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी